भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५०० / माहिती कक्ष / वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः- ३१/०८/२०१६

**१) गैरकायदयाची मंडळी जमवुन सार्वजनीक मालमत्तेची नुकसानी केल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक ३०/०८/०१६ रोजी १४.०५ ते १८.३० वा. दर. यातील आरोपीतांनी पो. स्टे. तुमसर मर्ग क्र. २०/१६ कलम १७४ जाफौ. मधील मृतक महीला सौ.जयश्री राजेश ठवकर वय २८ वर्ष, रा. खापा हीचा मृत्यु तिचे बाळतपणात शासकीय सु. बो. दवाखाना तुमसर येथे उपचार करणा-या वैदयकीय अधिकारी यांचे निष्काळजीपणे व हलगर्जी पणामुळे झाला. त्यामुळे त्यांना निलबित करावे व त्याचेवर फौजदारी गुन्हा दाखल करावा.. यामागनी करीता खापा चौक या राज्यमार्गावर खापा गावातील लोकांनी व यातील आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन रास्ता रोको करुन रस्त्यावर टॉयरची जाळपोड करुन रस्त्यावरील वाहने, एसटी बसेस अडवुन, बसेसची तोडफोड करुन कायदा व सुव्यवस्थेची मोठी परीस्थीती निर्माण झाल्याने गैरकायदयाच्या जमावावर सौम्य बळाचा वापर करुन लाठीचार्ज करण्यात आला असता यातील आरोपीतांनी बंदोबस्तातील अधिकारी, कर्मचारी यांचेवर दगडफेक करुन एकुण १४ पोलीस अधिकारी कर्मचारी यांना जखमी, जबर जखमी केल्याने फिर्यादीचे व जखमीचे एमएलसी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १४५,१४७,१४८,१४९,३५३,३३२,३३३,४३५,१८८भादंवि. सहकलम ६८,१३५ मपोका सहकलम ३ सार्वजनीक मालमत्ता नुकसान प्र.कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोनी. शेटे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) विवाहीतेने पतीच्या त्रासाला कंटाळुन विष प्राशन करुन आत्महत्या केल्याने गुन्हा नोंद . :-**

सन २००८ ते २८/०८/२०१६ पर्यन्त यातील मृतक सौ. अबिका गणेश बावने वय २६ वर्ष, रा. मांडेसर हिने यातील आरोपी सोबत प्रेम विवाह केला होता. परंतु त्यानंतर आरोपी पती हा तिला नेहमी मारहान करुन शिविगाळ देवुन मानसीक व शारीरीक त्रास देत होता. त्या त्रासाला कंटाळुन मृतक हीने कोणतेतरी विष प्राशन करुन आत्महत्या केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन व मर्ग क्र. ११/१६ कलम १७४ जाफौ. तपासावरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ४९८(अ),३०६ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गेडाम पो. स्टे. मोहाडी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) लाकडी दांडयाने मारुन जखमी करुन जिवाने मारण्याची धमकी दिली . :-**

दिनांक २९/०८/२०१६ रोजी २२.०० वा दर. यातील फिर्यादी एकनाथ आसाराम तवाडे वय ३० वर्ष, रा. पिपळगांव सडक याने आरोपीला रस्त्यावर 'तु गुरे ढोर बांधते आणि आमची बदनामी का करतोस' असे बोलले असता आरोपीने भांडण करुन लाकडी दांडयाने फिर्यादीचे कपाळावर, पाठीवर, हातावर, मारुन जखमी केले. व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने असे फिर्यादीचे व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४,५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. रामटेके पो. स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**४) विदयुत आईलची चोरी . :-**

दिनांक ३०/०८/२०१६ रोजी १६.०० वा. पुर्वी. यातील कोणीतरी अज्ञात चोराने रोहीत्राच्या (डी.टी. सी.) खालच्या बाजुला असलेल्या नट बोल्ड काढुन १३० लिटर विदयुत ऑईल कि. ८,०००/-रु. चा माल चपराड शेत शिवार येथुन चोरुन नेल्याने फिर्यादी राधेश्याम श्रीराम देवगडे वय ३६ वर्ष, रा. सहा. अभियंता म.रा.वि. वि केन्द्र लाखांदुर विदयुत वितरण केन्द्र यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३७९ भांदवि. सहकलम १३६ भाविका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोयर पो. स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**५) संगनमत करुन घरात प्रवेश करुन महीलेला ओढतान करुन बळजबरीने पकडुन नेल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ३०/०८/२०१६ रोजी २०.३० वा. दर. यातील फिर्यादी मयुर राजेश खोब्रागडे वय २३ वर्ष, रा. पंचशिल वार्ड साकोली हा आपल्या राहते घरी पत्नी सौ. विदया, वडील, आजी, व बहीनी सह हजर असतांना यातील आरोपी हा फिर्यादीचे पत्नीचा काका व इतर तीन अनोळखी आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीचे घरात प्रवेश करुन फिर्यादीची पत्नी हिचा हात पकडुन ओढुन नेत असतांना तिला सोडवण्यास फिर्यादी व आजी ध्रृपताबाई हे गेले असता त्यांना आरोपीतांनी ओढतान केल्याने फिर्यादीचे आजी खाली पडुन तिचे डावे पायाला जखम झाल्याने व फिर्यादीचे पत्नीस बळजबरीने पकडुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४५२,३६५,३२३,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोनि. गावंडे पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**६) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :—**

दिनांक ३०/०८/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. मोहाडी, भंडारा कारधा, वरठी, साकोली अडयाळ व लाखांदुर येथील अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण १६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १५६ लिटर हातभट्टी दारु कि. ११,९००/रू व देशी दारू ७ लिटर ३८० मिली देशी दारू कि. १४,४३०/—रु. तसेच जुगारातुन ४९५/रू असा एकुण कि. १८,९२५/—रू. चा माल जप्त करण्यात आहे.

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.